# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(सायंकाळ)

जा.क्र. ४६३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:—३१/०७/२०१६.

**१) विषारी सर्पव्दंशाने इसमाचा मृत्यु . :—**

दिनांक २८/०७/०१६ रोजी १९.४० वा. दर. यातील मृतक ईस्तारी राजराम खरावे वय ६० वर्ष रा. पालडोंगरी हा शेतात धानाचा परा काढीत असतांना उजवे हाताचे बोटाला विषारी सापाने चावा घेतल्याने त्यास औषध उपचारा करीता सा.रु. भंडारा येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉ. मेमो वरुन पोस्टे भंडारा येथे मर्ग क्र. ००/१६ कलम १७४ जाफौ. चे कागदप प्राप्त झाल्याने सर तर्फे फिर्यादी पोहवा. परतेकी पो. स्टे. आंधळगाव येथे नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील चौकशी पोहवा. बांभरे पो. स्टे. आंधळगाव हे करीत आहेत.

**२) विवाहीतेने स्वत:ला जाळुन आत्महत्या केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ३०/०७/०१६ रोजी ०१.०० ते ०४.०० वा. दर. यातील मृतक सौ. पंचफुलाबाई कचरु धनविजय वय ७० वर्ष, रा. पाउनगाव ही अंदाजे ०८ दिवसा पासुन पागल सारखी वागत होती. पागलपनाचे भरात मृतकने स्वत:चे घरी बाथरुम मध्ये स्वत:ला जाळुन आत्महत्या केली असे फिर्यादी मिलींद कचरु धनविजय वय ३६ वर्ष, यांचे तोडीं रिपोर्ट वरुन पोस्टे लाखांदुर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोद करण्यात आला. पुढील चौकशी पोहवा. खंडाते पो. स्टे. लाखांदुर हे करीत आहेत.

**३) स्त्रिचा उपचारा दरम्यान मृत्यु . :—**

दिनांक ०४/०७/०१६ रोजी १९.०० वा. दर. यातील मृतक सौ. ज्योती प्रमोद पिल्लारे वय ४५ वर्ष, ही आपल्या पती सोबत हिरोहोंन्डा मोटार सायकल क्र. एमएच ३६/४१४६ ने मागे बसुन स्व:गावी जैतपुर येथे जात असतांना मोटार सायकल रोडाच्या खडयातुन गेल्याने मृतक ही खाली पडल्याने तिचे डोक्याला मागील बाजुस मार लागल्याने तिला औषध उपचारा करीता मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले असता दि.०८/०७/२०१६ उपचारा दरम्यान मरण पावल्याने पोस्टे अजनी नागपुर येथे मर्ग क्र. ००/१६ कलम १७४ जाफौ. चे कागदप टपाला व्दारे प्राप्त झाल्याने सर तर्फे फिर्यादी पोहवा. भलावी पो. स्टे. लाखांदुर येथे नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील चौकशी पोउपनि. निंबेकर पो. स्टे. लाखांदुर हे करीत आहेत.

४) उपचारा दरम्यान मृत्यु . :—

दिनांक ३०/०७/०१६ रोजी ११.४५ वा. दर. यातील मृतक हेमंत मुरलीधर बिरे वय २५ वर्ष, याची अचानक प्रकृती बिघडल्याने डॉ. चव्हान यांचे कडे औषधोपचारास नेले असता त्यांनी सा.रू. भंडारा येथे नेण्यास सांगीतले वरून त्याला सा.रू. भंडारा येथे नेले असता डॉ. रांनी तपासुन ब्रॉड डेथ घोषीत केल्याने डॉ. मेमो व मृतकाच्या काकाच्या बयानावरून पो.स्टे. भंडारा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोद करण्यात आला. पुढील चौकशी स.फौ. कन्हाके पो. स्टे. भंडारा हे करीत आहेत.

for (signature) 30/7/16
पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करिता.

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, **संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.